दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२५२ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, २३ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## गोएंका शाळेबाहेर पालकांचे नऊ तास ठिय्या आंदोलन, प्रशासनावर कठोर कारवाईची मागणी




**ठाणे,यश सावंत :**
कापुरबावडी येथील सी. पी. गोएंका शाळेसमोर गुरुवारी शाळा व्यवस्थापनाला बदलण्याची मागणी करत पालकांनी सुमारे नऊ तास ठिय्या मांडला. काही पालकांनी त्यांच्या पाल्यांना शाळेत पाठविले नाही. अनेक पालक उपाशीपोटी आंदोलन करत होते. न्याय मिळत नाही. तोपर्यंत आम्ही हटणार नाही असा निर्णय पालकांनी घेतला होता. पालकांचे शिष्टमंडळ आणि शाळेच्या विश्वस्त मंडळाची गुरुवारी दुपारी उशिरापर्यंत बैठक सुरू होती. त्यानंतर शाळा प्रशासनाने आणखी तीन जणांना निलंबित केले. कापुरबावडी भागात ह्यसी. पी. गोएंका इंटरनॅशनल स्कूलह्व या शाळेतील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांची मंगळवारी घाटकोपर येथील एका थीम पार्कमध्ये सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी १ हजार ६०० रुपये घेण्यात आले होते. एका खासगी कंपनीच्या बसगाड्यांमधून विद्यार्थ्यांना सहलीसाठी नेले जात होते. मंगळवारी एकूण चार बसगाड्या या सहलीसाठी निघाल्या. या बसगाडीपैकी एका बसगाडीत जावेद खान हा सेवक (अटेन्डन्ट) म्हणून होता. बसगाडीमध्ये खाद्य पदार्थाची पाकिटे वाटत असताना, जावेद याने काही मुला-मुलींचा विनयभंग केला. बसगाडीमधून उतरल्यानंतर एका मुलीने तिच्या पालकांना याप्रकाराबाबत माहिती दिली. त्यानंतर आणखी सात ते आठ मुला-मुलींसोबत असा प्रकार घडल्याचे समोर आले. याप्रकरणी पालकांनी रात्री उशिरा याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार, कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी जावेद खान याला अटक केली होती. तर बसगाड्यांमधील तीन शिक्षकांना निलंबित केले होते. मनसे, शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपने पालकांच्या बाजूने भूमिका घेत शाळा प्रशासनावर टीका केली. तसेच भाजपच्या माजी नगरसेविका मृणाल पेंडसे यांनी देखील कापूरबावडी पोलिसांना शाळा प्रशासनाविरोधात निवेदन दिले.

गुरुवारी सकाळी अनेक पालकांनी त्यांच्या मुलांना शाळेत पाठविले नाही. तसेच सकाळी ७.३० वाजेपासून पालकांनी शाळेबाहेर जमण्यास सुरुवात केली. त्यानंतर मनसे, भाजपचे पदाधिकारी देखील शाळेबाहेर जमले. घटनेविरोधात पालकांनी शाळा प्रशासनाला जाब विचारण्यास सुरुवात केली. तसेच व्यवस्थापन मंडळाविरोधात कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर शाळेतील विश्वस्त मंडळ आणि पालकांच्या शिष्टमंडळाची एक बैठक पार पडली. दुपारी ३ वाजेपर्यंत ही बैठक सुरू होती. पालक देखील शाळेबाहेर ठाण मांडून होते. दुपारी १ वाजताच्या सुमारास आमदार संजय केळकर हे देखील शाळेत आले. त्यांनी शाळा प्रशासनाला धारेवर धरले. अखेर शाळेच्या विश्वस्तांनी शाळेच्या आणखी तीन जबाबदार अधिकाऱ्यांना निलंबित केले. त्यानंतर पालकांनी त्यांचे आभार मानले. सी.पी. गोएंका शाळेत भाजपचे आमदार संजय केळकर हे त्यांच्या काही पदाधिकाऱ्यांसह शाळेमध्ये शिरले. परंतु पदाधिकाऱ्यांना शाळेबाहेर काढा अशी मागणी पालकांच्या एका गटाने केली. त्यामुळे भाजपच्या काही पदाधिकाऱ्यांना शाळेबाहेर पडावे लागले. दुपारी उशिरापर्यंत पालकांचा शाळेबाहेरील ठिय्या कायम होता.

## मुख्यमंत्री शिंदे अन् नारायण राणेंची बंद दाराआड भेट, राजकीय चर्चांना उधाण



**मुंबई, विशेष प्रतिनिधी :**
भाजपाचे नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची बंद दाराआड भेट झाली आहे. भेट घेतल्याने आता या भेटीला लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्व प्राप्त झालं आहे. ही भेट नेमकी कशासाठी होती? याचा तपशील समजू शकणार नसला तरी रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून नारायण राणे यांनी निवडणूक लढवावी, असे आदेश भाजपच्या नेतृत्वाने दिले आहेत. मुख्यमंत्री व नारायण राणे यांची सह्याद्री अतिथिगृहावर बंद दाराआड भेट झाली आहे. ही भेट वैयक्तिक असल्याचं सांगितलं जात आहे. शिवसेना - भाजपा - राष्ट्रवादी महायुतीकडून नारायण राणे हे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी आता राणे यांना महायुतीच्या नेत्यांचीही मदत लागू शकते. शिवसेनेकडून उद्योगमंत्री उदय सामंत यांचे ज्येष्ठ बंधू किरण सामंत यांचे नाव या लोकसभा मतदारसंघासाठी यापूर्वी चर्चेत होतं.

मात्र, आता या रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून कोकणाचा मोठा अभ्यास व मोठा संपर्क असलेले केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनाच या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. शिवसेना - भाजपा - राष्ट्रवादी महायुतीकडून नारायण राणे हे रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी आता राणे यांना महायुतीच्या नेत्यांचीही मदत लागू शकते. शिवसेनेकडून उद्योगमंत्री उदय सामंत यांचे ज्येष्ठ बंधू किरण सामंत यांचे नाव या लोकसभा मतदारसंघासाठी यापूर्वी चर्चेत होतं. मात्र, आता या रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून कोकणाचा मोठा अभ्यास व मोठा संपर्क असलेले केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनाच या मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

## विरारमध्ये भटक्या कुत्र्यांचा वृद्धावर जिवघेणा हल्ला, वसई-विरारमध्ये दहशतिचे वातावरण

**विरार, रोहित जसवाल :**
वसई-विरारमध्ये भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांची दहशत वाढली असून गुरुवारी पहाटे विरार पश्चिमेतील भटक्या कुत्र्यांनी ८३ वर्षीय वृद्धावर हल्ला केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले आहेत. काही महिन्यांपूर्वी वसईमध्ये एका लहान मुलावर भटक्या कुत्र्यांनी हल्ला केला होता. गुरुवारी विरार पश्चिमेतील आगाशी येथील कोल्हापूर गावात पहाटे फिरण्यासाठी आलेल्या सायमन मिनेज (८३) यांच्यावर परिसरातील भटक्या कत्र्यांनी हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला व हाताला गंभीर दुखापत झाली आहे. त्यांना नालासोपाऱ्यातील तुळींज रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यामुळे भटक्या कुत्र्यांचा विषय वसई-विरारमध्ये ऐरणीवर आला आहे. भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या अपघातातही वाढ झाली आहे. भटके कुत्रे वाहनचालकांच्या मागे लागत असल्याने अनेकदा वाहन



चालकांचादेखील यामुळे अपघात झालेला आहे. प्रशासनाने यावर लक्ष देत नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

## शताब्दी रुग्णालयात दोन दिवसांपासून रक्त चाचण्या बंद, रुग्णांचे हाल



**मुंबई, विशाल पाटील :**
गोवंडीच्या शताब्दी रुग्णालयात कंत्राटी पद्धतीवर रक्त चाचणी करणाऱ्या केंद्रामधील कर्मचाऱ्यांना गेले तीन महिने पगार मिळालेले नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी दोन दिवसांपासून रक्त चाचण्या करणे बंद केले आहे. परिणामी, रुग्णांना रक्त चाचणीसाठी खासगी प्रयोगशाळेत जावे लागत आहे. त्यामुळे रक्त चाचणीची जबाबदारी सोपविलेल्या संबंधित कंपनीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी रुग्णांकडून करण्यात येत आहे. गोवंडीमधील शताब्दी रुग्णालयात चेंबूर, मानखुर्द, गोवंडी, देवनार आणि आसपासच्या परिसरातून दररोज ५०० रुग्ण येत असतात. यापैकी १०० ते १५० रुग्णांची रक्त चाचणी करणे आवश्यक असते. गेल्या काही वर्षांपासून पालिकेने कृष्णा डायनोजस्टिक या कंपनीला रुग्णालयातील रक्त चाचणी केंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास दिले आहे. शताब्दी रुग्णालयातील रक्त चाचणी केंद्र हीच कंपनी चालवित आहे. मात्र तीन महिन्यापासून या केंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगारच मिळालेला नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांनी मंगळवारपासून रक्त चाचण्या करणे बंद केले आहे. दरम्यान, रक्त चाचणी केंद्रातील काम बंद करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात येईल, असे कृष्णा डायनोजस्टिक कंपनीतील एका अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले. कंपनी आणि कर्मचाऱ्यांमधील भांडणात सर्वसामान्य रुग्ण भरडले जात आहे. त्यामुळे पालिकेने तत्काळ संबंधित कंपनीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी रुग्णांनी केली आहे.

## गेल्या वर्षभरात ४८ हजार बेकायदा फलकांवर कारवाई, गुन्हा मात्र २२ प्रकरणांतच

### कारवाईतील तफावतीवर उच्च न्यायालयाचे बोट

**मुंबई, विशाल कारंडे :**
मुंबईत गेल्या वर्षभरात ४८ हजारांच्या आसपास बेकायदा फलकांवर कारवाई करण्यात आल्याचा आणि त्यातील २२ प्रकरणांत गुन्हा दाखल केल्याचा दावा महापालिकेने बुधवारी उच्च न्यायालयात केला. मात्र, कारवाई करण्यात आलेल्या फलकांच्या आणि गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संख्येतील तफावतीवर बोट ठेवून ही कारवाई समाधानकारक आहे का, असा उपरोधिक प्रश्न न्यायालयाने महापालिकेने केला. गेल्या वर्षभरात कारवाई करण्यात आलेल्या बेकायदा फलकांत १०,८३९ राजकीय, ४,५५१ व्यावसायिक आणि सुमारे ३२,४८१ बेकायदा फलकांचा समावेश आहे. महापालिकेतर्फे करण्यात आलेल्या कारवाईबाबतही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. तसेच, सद्यस्थितीला



शहरात फेरफटका मारल्यास पदपथ, पथदिवे आणि झाडांवरही सर्रास बेकायदा फलकबाजी दिसून येईल, असेही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने महापालिकेला सुनावले. त्यावर, महापालिका अधिकाऱ्यांकडून दरदिवशी पाहणी करून बेकायदा फलकांवर कारवाई केली जात असल्याचा दावा महापालिकेच्या वतीने वरिष्ठ वकील अनिल साखरे आणि वकील केजाली मस्तकार यांनी केला. याशिवाय, वर्षभरात केलेल्या कारवाईपैकी ४१० बेकायदा फलकांबाबतचा अहवाल पोलिसांना पाठवण्यात आल्याचे आणि पोलिसांनी त्यातील २२ प्रकरणात गुन्हे नोंदवल्याचेही महापालिकेतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. परंतु, न्यायालयाने दाखल गुन्ह्यांच्या संख्येवरून पुन्हा नाराजी व्यक्त केली. मुंबई : मुंबईत गेल्या वर्षभरात ४८ हजारांच्या आसपास बेकायदा फलकांवर कारवाई करण्यात आल्याचा आणि त्यातील २२ प्रकरणांत गुन्हा दाखल केल्याचा दावा महापालिकेने बुधवारी उच्च न्यायालयात केला. मात्र, कारवाई करण्यात आलेल्या फलकांच्या आणि गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संख्येतील तफावतीवर बोट ठेवून ही कारवाई समाधानकारक आहे का, असा उपरोधिक प्रश्न न्यायालयाने महापालिकेने केला.

## निर्यात क्षेत्रात कोकण विभाग प्रथम, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते 'राज्य निर्यात पुरस्कारांचे' वितरण



रत्नागिरी, दिगंबर जाधव : राज्यातील एकूण ५३ उद्योग घटकांना उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते राज्य निर्यात पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या पुरस्कार सोहळ्यात ५३ पैकी २० पुरस्कार पटकावून संपूर्ण राज्यात कोकण विभागाने प्रथम क्रमांक मिळवला आहे. याच कार्यक्रमात देशातील २४ संस्थांसोबत सामंजस्य करारही करण्यात आले.

कोकण विभागात ठाणे विभागात सहा उद्योगांना तसेच रत्नागिरीतील सहा उद्योगांना पुरस्कार मिळाले. रत्नागिरी विभागातील सुप्रिया लाइफ सायन्स लि. या कंपनीला दोन प्रवर्गात एकूण आठ सुवर्ण पुरस्कार प्राप्त झाले. तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे एमआयडीसीमधील सुप्रिया लाइफ सायन्सने महाराष्ट्रामध्ये अवल स्थान पटकावले आहे. रायगड विभागातील चार उद्योगांना राज्य पुरस्कार मिळाले तर, पालघर विभागात तीन कंपन्यांना पुरस्कार प्राप्त झाले. सिंधुदुर्ग विभागात एका कंपनीला राज्य पुरस्काराने गौरवण्यात आले.या कार्यक्रमादरम्यान निर्यातदार उद्योजकांची उत्पादने प्रदर्शित करण्यात आली. ज्यामध्ये कोकण विभागातील पाचही जिल्ह्यांच्या नऊ उद्योजकांनी सहभाग घेतला.

## जे.पी. नड्डा यांची खारघर येथील अश्वमेध यज्ञास भेट, मंदा म्हात्रे यांनी केले स्वागत

**नवी मुंबई, भावना जैन :**
खारघर येथील पेठपाडा येथे सुरू असलेल्या अश्वमेध महायज्ञास गुरूवारी भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनी भेट दिली. खारघर, नवी मुंबई येथे त्यांचे आगम होताच आमदार मंदाताई म्हात्रे यांनी त्यांचे स्वागत केले ! या प्रसंगी , उपमुख्यमंत्री. देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे नड्डा यांच्यासमवेत होते. आपल्या राष्ट्राची एकता, प्राणीमात्रांचे कल्याण आणि जागतिक शांतीच्या उद्देशाने या महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे . यावेळी '1008 कुण्डीय महायज्ञ'मध्ये सहभागी होऊन. अद्वितीय आध्यात्मिक वातावरण आणि सकारात्मक ऊजेर्ची अनुभूती मिळाली, अशा भावना सर्वच उपस्थितांनी व्यक्त केल्या. यावेळी भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते, पाटीर्तील सहकारी, पदाधिकाऱ्यांसह भाविक मोठ्या संख्येने सहभागी होते. २१ ते २५ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमदेखील आयोजिले आहेत. यामध्ये १००८ कुंडिया महायज्ञ, वैदिक संस्कार, दीप महायज्ञ, आध्यात्मिक पुस्तक प्रदर्शन, रक्तदान आणि अवयव यासारखे सेवाभावी कार्यक्रमदेखील आयोजित केले आहेत. या सोहळ्याला पाच लाखांपेक्षा जास्त भक्त देशाच्या विविध कोनाकोपऱ्यातून उपस्थित राहणार असून, त्यांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था कार्यक्रम ठिकाणी केली आहे.



## आमच्या मुलांना जर त्रास झाला तर आम्ही जशास तसं उत्तर देऊ, जरांगेंनी केला निर्धार

**जालना, सचिन कदम :**
मराठा समाजाची मागणी इतर मागास वगार्तूनच (ओबीसी) आरक्षण मिळण्याची आहे. आमची फसवणूक झाली आहे, असे सांगत मनोज जरांगे यांनी पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. येत्या २४ तारखेपासून मराठा बांधवांनी प्रत्येक गावागावात आंदोलन करावं. आपल्याला सरकारला जेरीस आणण्यासाठी आंदोलन करायचं आहे. त्यामुळे २४ तारखेपासून दरदिवशी साडे दहा वाजता प्रत्येक गावात एकाचवेळी रास्ता रोको करा. आता नेतेमंडळींचा आणि आपला संबंध नाही. त्यांना आपल्या दारात येऊ द्यायचं नाही, अशी आंदोलनाची दिशा मनोज जरांगे यांनी उपस्थित समाजबांधवांना सांगितली. त्याचवेळी आमच्या मुलांना जर त्रास झाला तर आम्ही जशास तसं उत्तर देऊ, असा इशाराही त्यांनी सरकारला दिला. आता गावागावील वृद्धांनी उपोषणाला बसावं, त्यांच्या जीवाचं बरंवाईट झालं तर सरकार त्याला जबाबदार असेल, असे सांगताना आम्ही लढण्यासाठी सज्ज आहोत असा इशारा त्यांनी दिला.

मनोज जरांगे म्हणाले, येत्या २४ तारखेपासून गावा गावात रास्ता रोको आंदोलन करा. आंदोलनं सरकारला जेरीस आणण्यासाठी करायचं आहे. सगे सोयऱ्याची अंबलबजावणीसाठी आपल्याला संघर्ष करायचा आहे. दररोज सकाळी १०.३० वाजल्यापासून दुपारी १



वाजेपर्यंत आपापल्या गावात आंदोलन करायचं. पोलिसांना आंदोलनाची परवानगी मागा, परवानगी दिली तर उत्तम पण जरी परवानगी नाकारली तरी तुम्ही आंदोलन करा. ज्याला सकाळी जमलं नाही त्याने सायंकाळी ४ ते ७ पर्यंत दररोज आंदोलन करायचं. परीक्षेच्या विद्यार्थ्यांना अडचण येता कामा नये. शांततेत आंदोलन करावं. कोणाची गाडी फोडायची नाही, जाळायची नाही पण ती गाडी पुढं जाऊ द्यायची नाही. आम्हाला पोलिसांनी सहकार्य करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

निवडणूक काळात आलेल्या उमेदवाऱ्याच्या गाड्या वापस जाऊ देऊ नका, त्याची जाळपोळ न करता त्या गाड्या ताब्यात घेऊन निवडणुका संपल्यावर परत करा. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणुका पुढे ढकलण्याचे यांना सांगितले पाहिजे, असंही जरांगे म्हणाले. सगेसोयरे तरतुदीची अंमलबजावणी होईपर्यंत एकही मराठा मागे हटणार नाही, असा निर्धार त्यांनी बोलून दाखवला.

## पुणेकरांना 'मुळशी'तून पाणी देण्यास टाटांचा 'ग्रीन सिग्नल'; लवकरच सादर होणार प्रस्ताव



**पुणे, अभिजित येरल्लू :**
शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता टाटा कंपनीच्या मुळशी धरणातून पाच टीएमसी पाणी घेण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार आग्रही आहेत. यासंदर्भात आता टाटा कंपनीनेही सकारात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. धरणाची उंची वाढवून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त पाण्यातून ही गरज पूर्ण करता येणे शक्य असल्याचे दिसून येत आहे. यासंदभार्तील प्रस्ताव लवकरच टाटा कंपनी व राज्य सरकारला सादर करण्यात येणार आहे, असे सूत्रांनी सांगितले. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांनी मुळशी धरण टप्पा एक व दोनमधील पिण्याच्या पाण्यासंदर्भात व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेतली. यावेळी टाटा कंपनी, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, 'पीएमआरडीए'चे आयुक्त आदी अधिकारी उपस्थित होते. मुळशी धरणाच्या टप्पा एकमध्ये धरणाची उंची एक मीटरने वाढविण्यास टाटा कंपनीने तत्त्वतः होकार दर्शवला आहे. याबाबतचा प्रस्ताव जलसंपदा विभागाकडून टाटा कंपनीला सादर करण्यात येणार आहे. धरणाची उंची वाढवल्यानंतर निर्माण होणाऱ्या पाण्याच्या फुगवट्यामुळे काही जमीन पाण्याखाली जाणार आहे. यातील ८० टक्के जमीन ही टाटा कंपनीच्या मालकीची

## भारताचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात 'आयुष समग्र कल्याण केंद्राचं' केल उद्घाटन

**नवी दिल्ली, प्रगती शर्मा:**
भारताचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाच्या परिसरात 'आयुष समग्र कल्याण केंद्राचं' उद्घाटन केलं. यादरम्यान, त्यांनी कोविडच्या साथीदरम्यान आपल्याला आलेल्या अनुभवाचा उल्लेख केला. यादरम्यान, त्यांनी सांगितले की, कोरोनाचा फैलाव होऊ लागल्यापासून मी आयुषशी जोडला गेलो आहे. मला कोरोनाचा गंभीर संसर्ग झाला होता. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला फोन केला आणि तुम्ही लवकर बरे व्हाल, सर्व काही ठीक होईल, अशी मला अपेक्षा आहे, असे म्हणाले. चंद्रचूड पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला सांगितले की, तुमची प्रकृती सध्या बरी नाही आहे, याची मला जाणीव आहे. मात्र आम्ही सर्व प्रयत्न करू. एक वैद्य आहेत जे आयुषमध्येही सचिव आहेत. मी त्यांच्याशी संपर्क साधण्याची व्यवस्था मी करतो. ते तुम्हाला औषध आमि इतर सर्व काही पाठवून देतील.



## नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरींच्या अडचणीत वाढ?

### भ्रष्टाचाराप्रकरणी सिनेट सदस्यांकडून सीआयडी चौकशीची मागणी



**नागपूर, नितीन देवळेकर :**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना राज्यपाल रमेश बैस यांनी पदावरून निलंबित केल्यानंतर आता पुन्हा डॉ. चौधरी यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. कारण, डॉ. सुभाष चौधरी यांनी केलेले भ्रष्टाचाराचे प्रकरण बघता त्याच्या सीआयडी चौकशीची मागणी सिनेट सदस्यांकडून करण्यात आली आहे. डॉ. चौधरी यांच्याविरोधात राज्यपाल कार्यालयाकडे अनेक तक्रारी होत्या. राज्यपालांनी या तक्रारींवर बाजू मांडण्यासाठी बुधवार 21 फेब्रुवारीला कुलगुरूंना बोलावले होते. मात्र, डॉ. चौधरींच्या उत्तराने राज्यपाल कार्यालयाचे समाधान न झाल्याने त्यांनी निलंबनाची कारवाई केली आहे. डॉ. सुभाष चौधरी यांच्या विरोधातील तक्रारींच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या उच्च तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर यांच्या समितीने आपला अहवाल राज्यपालांना दिला होता. या अहवालात कुलगुरूंकडून अधिकारांचा दुरुपयोग झाल्याचे, शासनाचे ह्यएमकेसीएलह्व संदर्भात आदेश असताना त्याची अवहेलना करण्यात आल्याचे ताशेरे ओढण्यात आले होते. परिणामी एकंदरीत या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेता कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांची पदावरून हकालपट्टी करण्याचे निर्देश राज्यपालांनी दिले.

//सुविचार ज्या व्यक्तीजवळ समाधान, सहनशीलता आणि सय्यम असतो तो व्यक्ती आयुष्यात काहीही करू शकतो. //



# गरम पाणी पिण्याचे फायदे

**जर** आपण त्वचेच्या समस्येने अस्वस्थ आहात किंवा त्वचेसाठी वेगवेगळी सौंदर्यप्रसाधने वापरून थकला असाल तर दररोज गरम पाणी पिणे सुरू करा. यामुळे आपली त्वचा समस्येतून मुक्तता होईल आणि चेहराही उजळेल.

- सकाळी उपाशीपोटी आणि रात्री जेवल्यानंतर गरम पाणी प्यायल्याने पचन समस्याही दूर होते.
- गरम पाणी पिण्याचे खूप फायदे असतात; ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. याने कफ आणि सर्दी लवकर दूर होते.
- वजन कमी करण्यातही गरम पाणी खूप मदत करते. गरम पाण्यात थोडं लिंबू किंवा काही थेंब मधाचे मिसळून प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.
- नेहमी तरुण दिसण्याची इच्छा ठेवणाऱ्यांसाठी गरम पाणी एका अतिशय चांगल्या औषधाचे काम करतं.
- दमा, उचकी इत्यादी आजारात आणि तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर गरम पाणी खूप उपयोगी असते.



# सडपातळ दिसायचे आहे; मग कपड्यांमध्ये या रंगांचा वापर

कपड्यांची खरेदी करताना स्टाईल, वर्क, पॅटर्न असे विविध पैलू पडताळून पाहिले जातात. काही महिला पटकन कपडे खरेदी करतात, तर काही महिलांना निवड करायला बराच वेळ लागतो. अर्थात, कपड्यांच्या खरेदीत रंगांचीही महत्त्वाची भूमिका असते. म्हणूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाला, बांध्याला साजेशा रंगांची निवड करणं आवश्यक आहे. ठरावीक रंगाच्या कपड्यांची निवड केल्यास स्थूल महिलाही बारीक दिसू शकतात. चला तर मग, अशाच काही रंगांविषयी जाणून घेऊ.







**गडद रंगाचे कपडे**

काळ्या रंगाच्या कपड्यांमध्ये तुम्ही बारीक दिसू शकता. काळा हा गडद रंग आहे. गडद रंग व्यक्ती बारीक असल्याचा आभास निर्माण करतात. काळ्यासोबतच नेव्ही ब्लू, ब्राऊन, चॉकलेटी, मरून, डार्क ग्रे असे रंगही तुम्ही निवडू शकता.

**गडद रंगाचा बॉटम आणि ब्राईट टॉप**

बारीक दिसण्यासाठी प्रत्येक वेळी एकाच रंगाचे कपडे घालणं गरजेचं नाही. तुम्ही लाईट आणि डार्क रंगांचं कॉम्बिनेशनही करू शकता. गडद रंगाच्या बॉटमवर ब्राईट टॉप घालता येईल. लाल आणि गुलाबी रंगाच्या छटा असणारे कपडेही खरेदी करता येतील. या रंगाचे ब्राईट कपडे तुम्हाला स्लिम लूक देतील. त्यामुळे स्थूल महिलांनी कपड्यांची खरेदी करताना रंगसंगतीकडे अधिक लक्ष द्यायला हवं.

**मोनोक्रोमॅटिक शेड्स**

मोनोक्रोमॅटिक शेड्सही तुम्हाला स्लिम लूक मिळवून देतील. मोनोक्रोमॅटिक लूकमध्ये शरीराचा स्थूलपणा लपतो. मोनोक्रोमॅटिक लूक म्हणजे एकाच रंगाचे कपडे परिधान करणं.

# पिस्ता खाण्याचे हे फायदे ऐकून तुम्हीही व्हाल अवाक्



सुकामेवा हे बहुतेकदा श्रीमंती खाणे समजले जाते. आर्थिकदृष्ट्या तर ते श्रीमंत आहेतच; पण पोषक तत्त्वे आणि आरोग्याच्या दृष्टीनेही सुकामेव्यातील अनेक घटक श्रीमंत आहेत. म्हणूनच सुकामेवा खाणं गरजेचं आहे. सुक्यामेव्यामध्ये वापरला जाणारा पिस्ता सर्वांनाच परिचित आहे. पिस्ता हे छोट्या आकाराचे चविष्ट व कठीण कवचाचे पौष्टिक फळ आहे. त्याचे कवच टणक, परंतु द्विदल असते. पिस्त्याच्या गरावर एक साल असते. त्याच्या आतील गराचा रंग हिरवट पिवळा असतो. पिस्त्याचे झाड आकाराने खूप मोठे व डौलदार असते. त्याच्या फांद्या समांतर व सर्व बाजूंनी सारख्या असून पानांनी बहरलेल्या असतात. पिस्त्याची झाडे इराण, अफगाणिस्तान, फ्रान्स, अमेरिका, तुर्कस्तान या भागामध्ये जास्त आढळतात. पिस्त्याला संस्कृतमध्ये म्युकुलका किंवा निकोचक, हिंदीमध्ये पिस्ता, इंग्रजीमध्ये पिस्ताचिओनट व शास्त्रीय भाषेत पिस्तासिया व्हेरा या नावाने ओळखले जाते.

**औषधी गुणधर्म**

पिस्ता चवीला मधुर, किंचित कडवट, उष्ण, वीर्यात्मक असून पित्तकर व कफवातघ्न आहे. तो पचायला जड व धातूंचे पोषण करणारा आहे. पिस्त्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ व जीवनसत्त्व हे सर्व घटक भरपूर प्रमाणात असतात.

**उपयोग -**

- पिस्त्यामध्ये जीवनसत्त्वातील थायमिन, नायसिन, रिबोफ्लेविन, कॅरोटीन हे घटक असल्यामुळे मज्जा संस्थेच्या कार्यासाठी पिस्ता सेवन उत्तम ठरते. दुधामध्ये पिस्त्याची पूड टाकून प्यायल्यास मेंदूचे कार्य उत्तम प्रकारे चालते. थकवा, नैराश्य ही लक्षणे जाणवत नाहीत.
- स्मृतिभ्रंश, विस्मरण जाणवत असेल तर नियमितपणे ४ ते ५ पिस्ते दुधात टाकून खावेत.
- चांगले कोलेस्टेरॉल निर्माण होऊन हृदयविकार टाळण्यासाठी नियमितपणे पिस्ता सेवन करावे.
- बदाम, पिस्ता, खडीसाखर दुधात घालून त्याची खीर बनवावी व ही खीर नियमितपणे रोज सकाळी सेवन केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते.

**सावधानता**

सहसा पिस्ते खारवून साठवण्याची पद्धत आहे. परंतु असे पिस्ते जास्त प्रमाणात खाणे आरोग्यास घातक आहे. अतिप्रमाणात मिठाचा वापर केल्यामुळे त्यात असणारे पौष्टिक व औषधी घटक काही प्रमाणात नाश पावतात. म्हणून त्याऐवजी न खारवलेले साधे पिस्तेही बाजारात मिळतात. त्यांचा वापर करावा. तेही नुसतेच खाल्ले तरी ते शक्तिदायक, आरोग्यपूर्ण, सकस असतात.

- पिस्त्यामध्ये विपुल प्रमाणात लोह असल्याने त्याच्या सेवनाने रक्त वाढते.
- पिस्त्याची फुले ही श्वसननलिकेतील व फुप्फुसातील वाढलेला कफ दूर करतात, म्हणून जुनाट खोकला, सर्दी, दमा यावर ही फुले गुणकारी ठरतात.
- मिठाईच्या शोभेसाठी व चव वाढवण्यासाठी पिस्त्याचा वापर करावा. घरगुती आइस्क्रीम, केक, बिस्कीट करताना सजावटीसाठी पिस्त्याचा वापर करावा.
- पिस्त्यामध्ये पौष्टिक घटक भरपूर असल्याने त्याच्या सेवनाने जंतूंविरुद्धची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. त्यामुळे लहान मुलांना व रुग्णांना नियमितपणे दुधातून पिस्ते द्यावेत.

# मशरूम खाण्याचे फायदे वाचाल, तर आवडत नसेल तरीही खाल

**कुत्र्याची छत्री** म्हणून ओळखले जाणारे मशरूम म्हणजे वनस्पतीवर वाढणारी नैसर्गिक खाण्यायोग्य बुरशीच असते. वनस्पती आणि प्राणी या दोन्हींचे काही गुणधर्म मशरूम्समध्ये असतात. वनस्पतीत न आढळणारं 'ड' जीवनसत्त्व त्यात असतं. मशरूम्स लो कॅलरी, लो सोडियम आणि फॅट फ्री असल्यामुळे त्यांच्या सेवनामुळे वजन आटोक्यात राहू शकतं, फळांप्रमाणे मशरूम्स ग्लुटेन फ्री असतात. त्यात अँन्टीऑक्सिडन्ट्स तर आहेतच, याशिवाय सेलेनियम, कॉपर यांसारखी खनिजं आणि पोटॅशियमही आहे. मशरूम्स हा 'बी' जीवनसत्त्वाचा एक चांगला स्रोत आहे. मशरूम पटकन शिजतात, सूप, पुलाव, भाज्या यात त्यांचा उपयोग केला जातो. फक्त मशरूम खाण्यायोग्य आहेत की नाहीत, हे बघून घ्यावं लागतं. कारण काही मशरूम्स विषारी असतात.

मुख्य म्हणजे ही फळभाजी पूर्णपणे सेंद्रीय आहे. रासायनिक पदार्थाचा वापरच होत नाही, त्यामुळे ती भेसळ करून बनवता येत नाही. यात असणारे प्रोटीन हे प्राथमिक दर्जाचे आहेत, म्हणजे शरीरास जसे हवे तसे ते आहेत. मशरूमचा वापर ज्या देशात मोठ्या प्रमाणावर होतो, तेथे दरडोई वर्षाला ७० किलोपर्यंत त्याचा वापर होतो. भारतात हे प्रमाण केवळ अर्धा किलो इतके आहे. उच्चभ्रू लोकच याचा वापर करतात. उत्तरेप्रमाणेच तामिळनाडू, कर्नाटक या परिसरातही मशरूमचे उत्पादन घेतले जाते. लग्नसमारंभात या भाजीला मानाचे स्थान आहे. प्रोटीन शरीरात जाण्यासाठी मटन, मासे, दूध, सोयाबीन याचा वापर होतो मात्र शून्य कोलेस्टेरॉल असणारा एकमेव पदार्थ म्हणून मशरूमची ओळख आहे. मशरूम तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे शेतीत ज्याला टाकाऊ पदार्थ म्हणून ओळखले जाते अशी सोयाबीन व गव्हाची गुळी, शिवाय साखर कारखान्यात शिल्लक राहिलेला बगॅस (उसाचा रस काढून शिल्लक राहिलेला चोथा) याला सर्वाधिक महत्त्व आहे. २५ दिवसांत या कच्च्या मालाचे खत तयार केले जाते. त्यात कोंबडीची विष्ठा, जिप्सम, डीओसी मिसळून त्यानंतर मशरूमचे उत्पादन मिळण्यासाठी ५० दिवसांचा कालावधी लागतो. पुढील १५ ते २० दिवस हे उत्पादन विक्रीस उपलब्ध होते. आपल्या देशात १९६८ साली आयसीएआर दिल्ली येथे हिमाचल प्रांतातील सोलन येथे मशरूमचे संशोधन करणारे केंद्र सुरू झाले.



# नारळाचे तेल; त्वचेसाठी वरदान

**कित्येक** शतके आपण आपल्याकडे परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्येदेखील बदल करण्याची गरज आहे. यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रोडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल.

नारळाच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडीकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढविण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापुराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, त्वचेवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटविण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.





वात्सल्याची होते
बरसात
आई तुझा हात
उन्हात आभाळाची
छाया
आई तुझी माया
साठलेला गोड मध
आई तुझे शब्द
पोथी ग्रंथाची खाण
आई तुझे ज्ञान
जिथे विश्व सारे येते
आई तुझे गाणे
मिळे प्रेम आणि
शांती
आई तुझी मूर्ती

# 'धर्माच्या नावाखाली तू मुलींना...' अनुरागचा बिग बॉस विजेता मुनव्वर फारुखीवर हल्लाबोल



बिग बॉसच्या १७ व्या सीझनमध्ये विजेता ठरलेला मुनव्वर फारुखी आता वेगळ्या कारणासाठी चर्चेत आला आहे. विजेता झाल्यानंतर वेगवेगळ्या कारणामुळे तो ट्रोल झाल्याचे दिसून आले आहे. बिग बॉसमधील अनुराग डोभालनं त्याच्यावर काही गंभीर आरोप केले असून त्यानं यावेळी शो मेकर्सवर देखील टीका केली आहे. अनुरागनं बिग बॉस १७ हा बायस्ड शो असल्याचे म्हटले असून या शो मध्ये अनेक गोष्टी फिक्स असतात असे सांगितले आहे. अनुरागनं त्याच्या बिग बॉसच्या जर्नीमध्ये अनेक मित्र जमवले तर काहींसोबत त्याचे खटके उडाल्याचे दिसून आले आहे. त्यात त्याची सर्वाधिक भांडणं होती ती मुनावर फारुखी सोबत. आताही त्यानं त्याच्याविषयी जे विधान केलं आहे त्यामुळे तो नेटकऱ्यांच्या चर्चेचा विषय आहे. बिग बॉस संपल्यानंतरही त्यातील काही वाद अजुनही थांबलेले नाहीत. मुनव्वर फारूखीनही अनेकांसोबत पंगा घेतल्याचे दिसून आले आहे. शो च्या शेवटच्या सत्रात त्यानं माफी मागत ज्यांच्यासोबत भांडणं केली त्यांना जिंकून घेतले होते. मात्र या सगळ्यात त्याची अनुरासोबतची भांडणं कायम आहेत. बिग बॉस १७ ची सुरुवातच मुळी अनुराग आणि मुनव्वरच्या भांडणानं झाली होती. शो मधून बाहेर पडल्यानंतर अनुरागनं अनेकदा लोकांमध्ये जाहीर वक्तव्य करुन लक्ष वेधून घेतले होते. त्यात त्यानं बिग बॉसला बायस्ड असे म्हटले होते. आता त्यानं मुनव्वर धर्माचा चूकीचा उपयोग करत असल्याचे आणि त्याचा फायदा घेत असल्याचे अनुरागनं म्हटले आहे.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - १४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 4 | | | | 6 | | |
| | | 1 | 2 | | 4 | | 7 | |
| | | | | | 3 | 5 | 1 | |
| 8 | 9 | | | 1 | | | 2 | 5 |
| 4 | 1 | | | 5 | 8 | | | 9 |
| | | | | | 9 | | | 6 |
| | 2 | | | 3 | 5 | 8 | | |
| 1 | 8 | 7 | | | | | | |
| | | 3 | | | | | | |

## उत्तर सुडोकू -१३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 6 | 9 | 7 | 1 | 4 | 2 | 3 | 5 |
| 1 | 5 | 7 | 9 | 2 | 3 | 4 | 6 | 8 |
| 3 | 4 | 2 | 5 | 6 | 8 | 9 | 7 | 1 |
| 7 | 9 | 1 | 6 | 4 | 5 | 8 | 2 | 3 |
| 4 | 2 | 3 | 8 | 7 | 9 | 5 | 1 | 6 |
| 5 | 8 | 6 | 1 | 3 | 2 | 7 | 9 | 4 |
| 6 | 3 | 4 | 2 | 5 | 7 | 1 | 8 | 9 |
| 2 | 1 | 8 | 4 | 9 | 6 | 3 | 5 | 7 |
| 9 | 7 | 5 | 3 | 8 | 1 | 6 | 4 | 2 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

## दिनविशेष

### २३ फेब्रुवारी

- १४५५: पाश्चिमात्य देशातील पहिले छापील पुस्तक गटेनबर्ग बायबल प्रकाशित झाले.
- १७३९: चिमाजी अप्पांच्या वसई मोहिमेत मानाजी आंग्रे यांनी रेवदंड्यावर हल्ला चढवला.
- १९४१: डॉ. ग्लेन सीबोर्ग यांनी प्लूटोनिअम हे मूलद्रव्य प्रथमच वेगळे केले.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ इवो जिमाची लढाई झ अमेरिकन नौदलाचे काही सैनिक (मरीन्स) प्रशांत महासागरातील माउंट सुराबाचीवर पोचले व त्यांनी तेथे अमेरिकन झेंडा उभारला. हे करीत असतानाचे त्यांचे छायाचित्र जगप्रसिद्ध झाले.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ अमेरिकन सैन्याने फिलिपाईन्सची राजधानी मनिला जपानी सैन्यापासून मुक्त केली.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ पोलंडच्या पोज्नान शहरात जर्मन सैन्याने शरणागती पत्करली.
- १९४५: दुसरे महायुद्ध झ रॉयल एअर फोर्सच्या विमानांनी जर्मनीतील फोर्झेम शहर बेचिराख केले.
- १९४७: आंतरराष्ट्रीय मानक संस्थेची (क्रड) स्थापना.
- १९५२: संसदेने कामगार भविष्य निर्वाह निधी विधेयक मंजूर केले.
- १९६६: सीरियात लष्करी उठाव झाला.
- १९९६: कोकण रेल्वेच्या चिपळूण झ खेड टप्प्यातील वाहतूकीचा शुभारंभ झाला.
- १९९७: रशियाच्या मीर या अंतराळस्थानकामधे आग लागली.
- २०००: संस्कृत पंडित रा. ना. दांडेकर आणि काश्मिरी कवी रेहमान राही यांना साहित्य अकादमीची फेलोशिप जाहीर.
- १६३३: विख्यात इंग्रजी रोजनिशीकार व कुशल प्रशासक सॅम्युअल पेपिस यांचा जन्म. (मृत्यू: २६ मे १७०३)
- १८५०: रिट्झ हॉटेल, लंडन आणि रिट्झ हॉटेल, पॅरिस चे निमार्ते सीझर रिट्झ यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९१४)
- १८७६: देबुजी झिंगराजी जानोरकर ऊर्फ संत गाडगे महाराज यांचा जन्म. (मृत्यू: २० डिसेंबर १९५६)
- १९१३: जादूगार प्रफुल्लचंद्र तथा पी. सी. सरकार यांचा जन्म. (मृत्यू: ६ जानेवारी १९७१)
- १९५७: तेलगु देसम पक्षाचे लोकसभेतील नेते येरेन नायडू यांचा जन्म. (मृत्यू: २ नोव्हेंबर २०१२)
- १९६५: झेकोस्लोव्हाकियाची टेनिस खेळाडू हेलेना सुकोव्हा यांचा जन्म.
- १९६५: मुंबईच्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेले पोलिस कमिशनर अशोक कामटे यांचा जन्म. (मृत्यू: २६ नोव्हेंबर २००८)

## भविष्य

**मेष** हितशत्रूंना आवर बसेल. भरणी नक्षत्राच्या व्यक्तींना राजकीय लाभ घडतील. कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार खरेदीत फसण्याचा.

**वृषभ** कृत्तिका नक्षत्राच्या व्यक्तींना सप्ताहारंभ नोकरीत हितशत्रू पीडेचा. १४ व १५ हे दिवस मृग नक्षत्राच्या व्यक्तींना शनिवार प्रवास.

**मिथुन** सप्ताह काहींना विशिष्टवेदनेतून हैराण करणारा. बाकी सप्ताहाची सुरुवात पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना वैयक्तिक उपक्रमांतून छानच.

**कर्क** अतिशय संमिश्र ग्रहमान राहील. पुनर्वसु नक्षत्राच्या व्यक्तींना शुक्राच्या राश्यांतराचा पुष्य नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमान राहतील.

**सिंह** यंत्रं, वाहनं आणि कामगार या त्रिघटकांतून उपद्रव निर्माण करणारा सप्ताह. मघा नक्षत्राच्या व्यक्तींनी अपवादात्मक उद्‌भवू पाहणाऱ्या परिस्थितीचं भान ठेवावं. विचित्र अडचणी

**कन्या** बाकी सप्ताह स्वतंत्र व्यावसायिकांना चांगला प्रतिसाद देईल. हस्त नक्षत्राच्या व्यक्तींचे मोठे व्यावसायिक करारमदार होतील. व्यावसायिक भांडवल पुरवठा होईल. पुत्रचिंता जाईल.

**तुला** प्रेम संबंधांमध्ये अधिक जवळीक निर्माण होईल. जर तुम्हाला काही मिळवायचे असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. राजकारणी लोकांच्या संपकार्मुळे तुम्हाला चांगला फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक** फक्त आजची संध्याकाळ आणि शनिवारची संध्याकाळ वातार्लापातून सांभाळावी. प्रेमिकांनी जपून. घरात कोणाचं लग्न ठरवाल. ज्येष्ठ नक्षत्राची व्यक्ती सप्ताहात चैनीवर खर्च करेल.

**धनु** उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्ती मॅन ऑफ दि मॅच होतील. मूळ नक्षत्राच्या व्यक्तींना ता. १५ हे दिवस मोठे गतिमानच राहतील. राजकीय व्यक्तींकडून लाभ. मात्र शनिवारी वेंधळेपणा टाळा.

**मकर** आज पार्टनर सोबत बोलताना सतर्क राहा. आज तुमची तुमच्या व्यक्तीकडे एखाद्या गोष्टीबद्दल राग व्यक्त कराल. लहान व्यावसायिकांना आज एखाद्या त्रासाला सामोरे जावे लागेल.

**कुंभ** शनिभ्रमणाच्या पार्श्वभूमीवर हेच सांगत आहे. बाकी ता. १४ च्या वसंत पंचमीची संध्याकाळ गाठीभेटींतून हृद्य राहील. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींना धनलाभ. तरुणांचं नैराश्य जाईल.प्रेमप्रकरणातून गती मिळेल.

**मीन** अर्थातच जीवनात उत्तम सीक्वेन्स लागतील. उत्तराषाढा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात हट्टीपणा टाळावा. धनिष्ठा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात थट्टामस्करी टाळावी. उत्तरा-भाद्रपदा नक्षत्राच्या व्यक्तींनी सप्ताहात चुकीच्या मित्रांची संगत टाळावी.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

